माहिती हवीय?

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

☐ ***तुफान और दिया, जलती निशानी, जिंदगी जिंदगी, इज्जत, पुकार, डॉक्टर, राहगीर, जादू* या चित्रपटातील नायक-नायिका कोण? संगीतकार व दिग्दर्शक कोण?**

– *तुफान और दिया*मधील नायक-नायिका राजेंद्रकुमार-नंदा, संगीतकार वसंत देसाई, दिग्दर्शक प्रभातकुमार. *जलती निशानी* या नावाचा चित्रपट दोनदा निर्माण झाला. पहिला १९३२ला. दुसरा १९५७ला. १९३२च्या *जलती निशानी*चे नायक-नायिका मा. विनायक-लीला, संगीतकार गोविंदराव टेंबे, दिग्दर्शक व्ही. शांताराम. १९५७च्या *जलती निशानी*चे नायक-नायिका कमल कपूर, गीताबाली, संगीतकार अनिल विश्वास, दिग्दर्शक हरीशं. *जिंदगी जिंदगी* १९७२ला आला होता. नायक-नायिका सुनील दत्त-वहिदा रहमान, संगीतकार एस.डी. बर्मन, दिग्दर्शक तपन सिन्हा. *इज्जत* या नावाचा चित्रपट चार वेळा आलाय. १९३७ला पहिला, १९५२ला दुसरा, १९६८ला तिसरा, १९९१ला चौथा. १९३७च्या *इज्जत*चे नायक-नायिका अशोककुमार-देविकाराणी, संगीतकार सरस्वतीदेवी, दिग्दर्शक फॅन्झ ओस्टेन. १९५२च्या *इज्जत*चे नायक-नायिका अमरनाथ-निरूपा रॉय, संगीतकार बुलो सी. रानी, दिग्दर्शक तमूर बहराम राहत. १९६८च्या *इज्जत*मध्ये धर्मेंद्रचा डबल रोल होता. या डबल रोलमध्ये तनुजा व जयललिता या त्यांच्या दोन नायिका होत्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल, दिग्दर्शक टी. प्रकाशराव. १९९१च्या *इज्जत*मध्ये जॅकी श्रॉफ नायक होता, नायिका संगीता बिजलानी, संगीतकार अनु मलिक, दिग्दर्शक अशोक गायकवाड. *पुकार* या नावाचा चित्रपट तीनदा आला. १९३९ ला पहिला. नायक-नायिका चंद्रमोहन-नस्सीम, संगीतकार मीरसाहेब, दिग्दर्शक सोहराब मोदी. १९८३ला दुसरा *पुकार* आला. या *पुकार*मध्ये अमिताभ बच्चन व रणधीर कपूर हे दोन नायक होते व झीनत अमन व टीना मुनीम या दोन नायिका, संगीतकार आर.डी. बर्मन, दिग्दर्शक रमेश बहल. १९३९ व १९८३च्या *पुकार*नंतरचा तिसरा *पुकार* म्हणजे अलीकडचा राजकुमार संतोषींचा *पुकार*. नायक-नायिका अनिल कपूर-माधुरी दीक्षित, संगीतकार ए.आर. रहमान, दिग्दर्शक राजकुमार संतोषी. *डॉक्टर* १९४१ला आला होता. नायक-नायिका पंकज मलिक-भारती देवी, संगीतकार पंकज मलिक, दिग्दर्शक सुबोध मित्तर. *राहगीर* या नावाचा चित्रपट दोनदा आला. १९४३ला पहिला. नायक-नायिका त्रिलोक कपूर-शांतारीन, संगीतकार खान मस्ताना, दिग्दर्शक ए. रशीद, १९६९ला दुसरा राहगीर आला. नायक-नायिका विश्वजीत-संध्या रॉय, संगीतकार हेमंतकुमार, दिग्दर्शक तरुण मजुमदार. *जादू* दोनदा आला १९५१ला पहिला. नायक-नायिका सुरेश-नलिनी जयवंत, संगीतकार नौशाद, दिग्दर्शक ए.आर. कारदार, १९६६ला दुसरा जादू आला. नायक-नायिका रंजन-चित्रा, संगीतकार बुलो सी रानी, दिग्दर्शक बी. गुप्ता.

सौ. सुधा कोटींकर, पंढरपूर.

☐ ***कुछ कुछ होता है*मधील राणी मुखर्जीची मुलगी व *गदर*मधील सनीचा मुलगा झालेला बालकलाकार कोण?**



– *कुछ कुछ होता है*मधील बालतारका बेबी सन्ना. *गदर*मधील बालकलाकार उत्कर्ष शर्मा.

परदेश परशुराम कोळी, वरेडी, कोळीवाडा.

☐ **नलिनी जयवंतचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण?**

– १९४१चा *राधिका* नलिनी जयवंतचा पहिला चित्रपट. नायक हरीश.

☐ **अशोककुमार व नलिनी जयवंत यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?**

– १९५०चा *समाधी*.

☐ **नलिनी जयवंतला कोणत्या चित्रपटासाठी पुरस्कार मिळालाय?**

– एकाही चित्रपटासाठी नाही.

नरेश राजाराम कोळी, वरेडी, कोळीवाडा.

☐ **दिलीपकुमारने कोणकोणत्या चित्रपटात डबल रोल केलाय?**

– *राम और श्याम*, *दास्तान* या चित्रपटात डबल रोल. *बैराग*मध्ये ट्रिपल रोल.

☐ **दिलीपकुमार व मधुबाला यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?**

– *तराना*, *संगदिल*, *अमर*, *मुगल-ए-आझम* या चार चित्रपटात.

पुरुषोत्तम घोरे, मुलुंड (प), मुंबई.

☐ **अरुणकुमार यांनी संगीतबद्ध केलेले चित्रपट कोणते? अशोककुमारशी त्यांचे काही नाते होते काय?**

– *प्रतिमा*, *परिणीता*, *तीन भाई*, *शमशीर*, *समाज* यासारख्या काही चित्रपटांना अरुणकुमारनी संगीत दिले. ते अशोककुमारचे मावस भाऊ होते.

संतोष हालकुडे, कुर्डूवाडी.

☐ **एका संगीतकाराने अर्धवट ठेवलेला चित्रपट दुसऱ्या संगीतकाराने पूर्ण केला असे चित्रपट कोणकोणते?**

– असे अनेक चित्रपट आहेत. *अनारकली* हा चित्रपट संगीतकार बसंत प्रकाश यांनी 'आ जाने वफा...' हे एक गाणे रेकॉर्ड केल्यानंतर अर्धवट सोडला होता. त्यानंतर सी. रामचंद्रनी हा चित्रपट पूर्ण केला. *हम कहा जा रहे है* हा चित्रपट सी. रामचंद्रनी एक-दोन गाणी केल्यावर सोडून दिला होता. त्यानंतर सी. रामचंद्रनी तो पूर्ण केला. *लाल हवेली* हा चित्रपट अर्धवट असताना संगीतकार मीरसाहेब यांचं निधन झालं. त्यांच्यानंतर सी. रामचंद्रनी तो चित्रपट पूर्ण केला. तो चित्रपट पूर्ण केला. *जान पहेचान* व *तमाशा* हे चित्रपट संगीतकार खेमचंद प्रकाश यांच्या निधनानंतर मन्ना डेनी पूर्ण केले. *मेहबूबा* हा चित्रपट रोशननी अर्धवट सोडला होता. नंतर ओ.पी. नय्यरनी तो पूर्ण केला. रोशन यांच्या निधनानंतर त्यांचा *अनोखी रात* हा चित्रपटत्यांची पत्नी इरा रोशन हिने पूर्ण केला. संगीतकार अनिल विश्वासनी *गर्ल्स स्कूल* हा चित्रपट काही गाणी केल्यावर सोडून दिला होता. नंतर तो सी. रामचंद्रनी पूर्ण केला. मदन मोहन यांच्या निधनानंतर त्यांचा *लैला मजनू* हा चित्रपट जयदेवनी पूर्ण केला. *शबिस्तान* हा चित्रपट सी. रामचंद्रनी अर्धवट अवस्थेत सोडून दिला होता. नंतर तो मदन मोहननी पूर्ण केला. गुलाम महमद यांच्या निधनानंतर *पाकीजा* नौशादनी पूर्ण केला. ●